**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक** 07/11/2025

**आरोपी इतर लोकसेवक -** श्री. आकाश बाबुराव आंबेगावे, तांत्रिक अधिकारी ( इंजिनियर ) नेमणूक - पंचायत समिती ता. जि. छत्रपती संभाजीनगर, यांनी तक्रारदार यांच्या कडुन 8,000/- (आठ हजार रुपये) लाच स्विकारल्याने आरोपी इतर लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे सिटीचौक येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| इलोसे यांचे नाव व पत्ता | श्री. आकाश बाबुराव आंबेगावे, वय 35 वर्ष, व्यवसाय :- नौकरी, पद - तांत्रिक अधिकारी ( इंजिनियर ) नेमणूक - पंचायत समिती ता. जि. छत्रपती संभाजीनगर, रा. सुमठाणा ता. उदगीर जि. लातूर |
| लाच मागणी रक्कम | 15,000/- (पंधरा हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 8,000/- (आठ हजार रुपये) |
| सापळा अधिकारी<br>सहा.सापळा अधिकारी | श्री. चैनसिंग गुसिंगे पोलीस निरीक्षक ला.प्र.वि. छत्रपती छत्रपती संभाजीनगर<br>श्री. शांतीलाल चव्हाण, पोलीस निरीक्षक ला प्र वि छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | यातील तक्रारदार यांचे मौजे लामकाना येथे गट क्रमांक 171 शिवारामध्ये स्वतःच्या मालकीची शेत जमीन 80 आर क्षेत्र असून त्या क्षेत्रामध्ये एम.आर.जी.एस. स्कीमच्या द्वारे विहीर मंजूर झाली होती, त्याचे एकुण बिल 4,00000/- ( चार लाख ) रुपये होते. सदरील विहीरीचे काम पूर्ण झाले असून एक अकुशलचे बिल मिळाले असून दुसरे कुशलचे बिल 1,71000/- रुपये शिल्लक राहिले होते. ते बिल काढून देण्यासाठी ईलोसे यांनी तक्रार दार यांच्या कडे 15000/- हजार रुपयांची लाच मागणी केली होती. तक्रारदारास लाच रक्कम द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी ला. प्र. वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार नोंदवली. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 06/11/2025 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजमावली असता, इलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे कुशलचे एकूण बिल 1,71000/-रुपये मंजूर करून देण्यासाठी 15000/- रुपयांची लाच मागणी करून तडजोडी अंती 8000/-(आठ हजार रुपये) स्वीकारण्याचे मान्य केले.<br>इलोसे यांच्या लाच मागणी नंतर दिनांक 07/11/2025 रोजी शासकीय पंच समक्ष सापळा कारवाई दरम्यान पंचायत समिती छत्रपती संभाजी नगर येथे इलोसे यांनी स्वतः तक्रारदार यांच्या कडून 8000/-(आठ हजार रुपये) लाच रक्कम स्वीकारली. ईलोसे यांनी लाच रक्कम स्वीकारल्यानंतर पंच समक्ष त्यांना सापळा पथकाने ताब्यात घेतले.<br>इलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आरोपी इतर लोकसेवक यांच्या विरुध्द पोलीस ठाणे सिटीचौक, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. नमुद गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना मार्फत करण्यात येत आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, पोलीस उप अधीक्षक श्री.सुरेश नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी निरीक्षक श्री.चैनसिंग घुसिंगे यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस निरीक्षक श्री.शांतीलाल चव्हाण, पो.अंम सचिन बारसे, राजेंद्र नंदिले , सी. एन बागुल ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

7/11/2025

सुरेश ह. नाईकनवरे
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर